Impact Factor 5.307 (SJIF)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी कविता

**प्रा. डॉ. अरविंद युगंधर**
मराठी विभाग प्रमुख,
व्ही. एम. व्ही. कॉलेज, वर्धमाननगर,
नागपूर – ४४०००८
मो.नं. ९८५०७३२८७४

---

**प्रास्ताविक :**

आज जागतिकीकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढते आहे. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये निरनिराळ्या प्रश्नांची भर पडत आहे. आंबेडकरी कविता या नव्या प्रश्नांचे आवर्त समजून घेण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी झालेला आहे? जागतिकीकरण म्हणजे काय? जागतिकीकरणाचे स्वरूप आणि भीषणता, जागतिकीकरणाचा समाजावर होणारा परिणाम, भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा विकसनशील देशावर वाढता प्रभाव, या समग्र वास्तवाचे प्रभावीपणे चित्रण आंबेडकरवादी कवितेमध्ये कशा प्रकारे साकार झालेले आहे या अनुषंगाने या शोधनिबंधामध्ये चर्चा करायची आहे.

**शोधनिबंधातील प्रमुख मुद्दे :**

जागतिकीकरणाची संकल्पना – जागतिकीकरण – जागतिकीकरणावर भाष्य करणारे आंबेडकरी कवी – आंबेडकरी कवितेतून वर्तमान परिस्थितीवर व्यक्त झालेले ताण–तणाव, जागतिकीकरणाच्या विरोधात व्यक्त झालेला विद्रोह – भांडवलशाहीच्या वाढत्या प्रभावात संवेदनशून्य होत चाललेला माणूस

आज जागतिकीकरण हा सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे. संपूर्ण जगालाच जागतिकीकरणाने विळखा घातलेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हा याच प्रक्रियेचा एक भाग आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण विश्व हे एक कुटूंब असून सर्वच राष्ट्र त्या कुटूंबाचे घटक आहेत. अशी उदात्त भावना आपण मान्य केली. याच विचार–चिंतन परंपरेला एक नवे परिणाम ज्ञान–विज्ञान–तंत्रज्ञानाच्या सृजनशील अविष्काराने दिलेले आहे. जागतिकीकरणामुळे आपल्याला जगभरातील लोकांशी जोडून घेता येते आणि जगामाध्ये कुठे काय चालू आहे हे साहित्याच्या माध्यमातून आपल्याला कळत आहे. त्यामुळे साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्राला नवे परिणाम प्राप्त होत आहे. या जागतिकीकरणाचा प्रभाव आंबेडकरवादी कवितेवर पाहावयास मिळतो. वाङ्मयीन प्रकारापेक्षा कवितेने प्रामुख्याने जागतिकीकरणाची दखल घेतली आहे. आणि म्हणूनच आपल्याला असे म्हणता येईल की एकूण मराठी कवितेला थेट जागतिकीकरणाच्या विश्वव्यापी समस्येशी नेवून भिडविण्याचे कार्य आज आंबेडकरवादी कवितेने केले आहे. या संशोधन लेखामध्ये जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील वास्तवांना आंबेडकरी कवितेतून मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

**जागतिकीकरण म्हणजे काय ?**

जागतिकीकरण ही संकल्पना १९८० पासून विचार व्यवहारात दिसत असली तरी भांडवलशाहीच्या उदयापासून ती प्रक्रिया सातत्याने सुरू असल्याचे आपल्याला पहावयास मिळते. स्पेन, पोर्तुगाल, ब्रिटन आणि हॉलंड ही राष्ट्र व्यापारी साम्राज्य या संकल्पनेवर उभारली गेली आहे. शोषण आणि प्रसार ही भांडवलशाहीची

Research Hub International Journal

सूत्रे असून या सूत्रावरच जागतिकीकरण आधारलेले आहे. जागतिकीकरणाच्या मुळाशी शोषणाचे पाळेमुळे दडलेली आहेत. हे अनेकदा इतिहासातून सिद्ध झालेले आहे.

आजचे शतक हे एकविसावे शतक असून या शतकामध्ये पाश्चिमात्य प्रगत देशांनी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना केली आणि विकसनशील गरिब देशांना हस्तगत करून त्या ठिकाणी आपल्या बाजारपेठा स्थापन केल्या आणि त्या देशाचा कच्चा माल आणि श्रम कमी किंमतीमध्ये विकत घेवून त्याचे पक्क्या मालात रूपांतर केले आणि आपल्या साम्राज्यामध्ये तो माल विकून भरपूर नफा कमविला.

भारताने १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण स्वीकारले ते पूर्णत: जागतिकीकरणाला पसंत करणारे आहे. १९४४ मध्ये अमेरीकेतील ब्रेटन वूड्स या गावी आर्थिक व्यवस्थापनाच्या संदर्भात जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये १) जागतिक बँक, २) आंतराष्ट्रीय नाने निधी, ३) सेवा उद्योग अशा भिन्न यंत्रणाच्या निर्मितीचा प्रामुख्याने विचार झाला. पुढे १९७० ते ८० या दशकामध्ये तेलाच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झाली आणि तेल निर्यात करणाऱ्या राष्ट्रांनी या काळात प्रचंड नफा कमविला आणि मिळालेला नफा त्यानी विकसीत देशातील बँकामध्ये गुंतविला आणि खाजगी उद्योगांना चालना दिली. आणि त्यातूनच विदेशी मुद्रांचा अनेक देशात संचार झाला. इ.स. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची (ॅज्व्) स्थापना झाली.

**जागतिकीकरणाची व्याख्या :—**

''सांस्कृतिक देवाण—घेवाणीच्या नावाखाली भांडवलदार देशातील संस्कृती पद्धतशीरपणे लादणे, म्हणजे जागतिकीकरण, तसेच गरिबांना त्यांच्या इतिहासापासून, संस्कृतिपासून दूर करणे, स्थानिक भाषा, लोकभाषांना श्रद्धांजली वाहणे म्हणजे जागतिकीकरण होय.'' [१]

''जागतिक पातळीवरील महासत्तांनी त्यांच्या देशातील लोकांना अत्युच्च जीवनमान जगता यावे यासाठी इतरांच्या शोषणावर आधारीत असलेली ही यंत्रणा जाणीवपूर्वक निर्माण केली आहे.'' [२]

**जागतिकीकरणाची व्याप्ती :**

जागतिकीकरणामुळे दूरचे जवळ येत असले तरी जवळ—जवळ नांदणारे समाज परस्परांपासून दुरावत चाललेले आहे, हे सुद्धा तेवढेच सत्य आहे. टी.व्ही., इंटरनेट, कॉम्प्युटर, मोबाईल, टेलिकॉम, ई—मेल इ. माध्यमांमुळे रशिया, इंग्लंड, अमेरिका, जपान हे देश जास्त जवळ आले. परंतु शेजारच्या वस्तीशी असलेले संबंध हे पूर्वीसारखे राहीले नाही. हे सत्यही नाकारता येत नाही.

**जागतिकीकरणाचा समाज जिवनावर पडलेला प्रभाव :**

जागतिकीकरणाचा परिणाम अनेक देशांवर पाहावयास मिळतो. एकूणन हा सर्वांना व्यापून टाकणारा, गुंतागुंतीचा आणि व्यापक असा परिणाम आहे. माहिती तंत्रज्ञानाचे व संगणकाचे हे युग आपल्यासमोर जे प्रश्न घेवून उभे आहे त्याचे निट आकलन करणे गरजेचे आहे.

या जागतिकीकरणाच्या परिणामातून साहित्यविश्व देखील सुटलेले नाही. या संदर्भात पाकिस्तानचा लेखक 'सलमान रश्दी' यांचे उदाहरण किंवा बांग्लादेशातील लेखिका 'तस्लिमा नसरीन' यांचा प्रामुख्याने

उल्लेख करता येईल. दोन्ही लेखकांनी समाजीवनातील सत्य आपल्या लेखनातून मांडल्यामुळे त्यांना देश सोडून देवून परदेशात स्वबचावासाठी जावे लागले हे वास्तव नाकारता येत नाही.

**जागतिकीकरण आणि आंबेडकरी कवी :**

जागतिकरणाचे ताणे—बाणे ज्या संवेदनशील कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून टिपले आहे त्यामध्ये सुनील अभिमान अवचार, महेन्द्र भवरे, हेमंतकुमार कांबळे, अरूण काळे, उत्तम कांबळे, अविनाश गायकवाड इ. कवींचा उल्लेख करावा लागेल.

आंबेडकरवादी कवितेचा केंद्रबिंदू हा सर्वसामान्य माणूस असून समाजातील शेवटच्या घटकातील सर्वसामान्य माणसाबरोबर आंबेडकरी कवितेचे नाते आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वसामान्य माणसाची होणारी दुरावस्था ही कविता मार्मिकपणे टिपतांना दिसते. देशामध्ये श्रीमंताची यादी वाढत आहे, रात्रंदिवस राबणारा शेतकरी आत्महत्तेस प्रवृत्त होत आहे, शिक्षणाचे बाजारीकरण, मूल्यांची घसरण, माणसामाणसातील वाढता दुरावा, वाढती विषमता, धार्मिक कर्मकांड, तरूण व्यसनाधिनता, दलितांवरिल वाढते अत्याचार इत्यादी जागतिकीकरणाचे परिणाम आजच्या सामाजव्यवस्थेवर पडत आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे आकलन आंबेडकरी कविता करतांना दिसते. कारण तिने सर्वहारा वर्गाच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणूनच अरूण काळे म्हणतात —

''हे तृष्णायुद्ध अन् हे धर्मग्रंथ
हे भाऊबंदकी जमिनीचे वाद
हे बांध अन् ह्या सीमा
हा संगणकीय पडदा
अन् हे त्यावर नसलेले
भूमिहीन आदिम
ही मॅच फिक्सिंग झाली आहे
युद्ध हरण्याच्या करारावर
सही झाली आहे'' (अर्थयुद्ध, पृ. ९)

आजच्या वर्तमानस्थितीचे विदारक चित्र वरिल कवितेतून व्यक्त होताना दिसते. वर्तमान परिस्थितीमध्ये दलित कुठे आहेत ? तर दलितांना 'डि—लिट' करण्याचे सॉफ्टवेअर बनविल्या जात आहे. या प्रक्रियेतून वाचण्यासाठी कवीला असे वाटते की, आंबेडकरी तत्वज्ञान हेच अँटीव्हायरस आहे. म्हणूनच 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा'' या कवितेच्या निमित्ताने कवी म्हणतो —

''आता या आय टी च्या युगात
दलितांना डि—लिट करण्यासाठी

नवनवीन सॉफ्टवेअर येत आहे

आणि प्रोग्राम खराब करण्यासाठी

सोडले जात आहे विषाणू

तरीही तुझी अँटी व्हायरस खबरदारी

पुन्हा पुन्हा करतेय त्यांना पराभूत''

(तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा, पृ. ३६)

'दृक' आणि 'श्राव्य' तसेच प्रिंट मिडियाची मालकी भांडवलदाराकडे असल्यामुळे या माध्यमातून मानवी परिवर्तनाचा मूल्यविचार दडपल्या जातो. मनोरंजन किंवा सनसनाटी आकर्षण व डोके गहाण ठेवणाऱ्या घटनाच अधोरेखित करून शोषणाचा अमानुष चेहरा झाकून ठेवण्याचा प्रयत्न केल्या जातो. हे वास्तव मांडताना सुनील अभिमान अवचार म्हणतात –

''मीडियाची हेडलाईन सेक्सला चिअर्स करते

पॉलिटिक्सवर डाऊनलोड होते

मीडिया वाटतो डाऊनलोडचा अंधार

उध्वस्त कंधार

मीडिया इराकची युद्धभूमी

संयुक्त राष्ट्रसंघाची ममी

जखमांचे रेडक्रॉस, इंटरपोलची आस

मीडिया डोकावतो व्हाईट हाऊस मध्ये

एसीचे प्रश्न : पेज–थ्री मध्ये

श्रमाची धग मात्र हलक्या हाताने

फेकली जाते डिलिट बॉक्समध्ये''

(मीडिया, पृ. १४)

या कवितेतून मीडियाचे होत जाणारे भांडवलीकरण आणि सर्वहाराच्या प्रश्नांवर होत जाणारे दुर्लक्ष मार्मिकपणे टिपले आहे. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग हे एक बाजारपेठ बनली आहे. माणूस आणि त्याचे शरीर विक्रीच्या वास्तू झाल्या आहेत, कामगार, शेतकरी आणि स्त्रीया यांच्यावर काय परिणाम होत आहेत हे व्यक्त करतांना कवी म्हणतात –

''कामगार स्वत:चे अवयव विकत आहेत स्वत:

Research Hub International Journal

जगाचा पोशिंदा करू लागला आहे आत्महत्या

सर्वदूर होत आहे स्त्रींची भृणहत्या

आणि श्वास बुरख्यात गुदमरतो आहे

आश्वासनाचा 'वल्ड कप' जगातील नेत्यांनी विकला आहे'' (ग्लोबल वर्तमान, पृ.१०)

जागतिकीकरणाच्या या पसाऱ्यात लोकशाहीवर भांडवली व्यवस्था कुरघोडी करीत आहे. उदारीकरण व खाजगीकरणाच्या या रेट्यामध्ये महासत्ता या विकसनीशील देशाचे आर्थिक सत्ताकेंद्र गिळंकृत करीत आहे.

**उत्तम कांबळे** :

**उत्तम कांबळे** सारखा कवी खेड्यामध्ये ग्लोबल गाव शोधण्याचा प्रयत्न करतोय. परंतु खेड्यातही धनवंतांची, बुद्धीवंतांची गर्दी आहे. संगणक, क्रेडीट कार्ड, पासपोर्ट, फॉरेन करन्सी, एक्सपोर्ट—इन्पोर्ट, एटीएम, ऑनलाईन सर्व्हिसेस, पासवर्ड, कोडवर्ड, माऊस, मोबाईल, ई—मेल, आणि चॅटिंग या गोष्टी या खेड्यातील भणंग माणसाजवळ काहीच नाही. सारं जग जवळ आलं तरी माणसापासून माणून दूर धावत आहे, रोबोच्या गळ्यात गळा घालत आहे, माणसाऐवजी कुत्र्यावर, कुत्र्याऐवजी यंत्रावर विश्वास टकत आहे. म्हणूनच कवी या वास्तवावर भाष्य करतांना म्हणतो —

जावं कुठं, राहाव कुठं

खेड्यात की शहरात

मान कुणाच्या खांद्यावर टाकावी

माणसाच्या की यंत्राच्या ?

माणसाचा घास ओढणाऱ्या यंत्राशी

मुकाबाला कसा करायचा ?

(जागतिकीकरणात माझी कविता, पृ. ११३)

हा कवीने उपस्थित केलेला प्रश्न यंत्र माणसावर आक्रमण करीत असल्याचा संकेत देतो.

**हेमंतकुमार कांबळे** :

हेमंतकुमार कांबळे यांनी 'आयुष्य नांगरतांना...' या दीर्घ चिंतनपर कवितेतून दलित शेतकरी—शेतमजूरांच्या आजच्या स्थितीविषयी विवेचन करतांना कवी म्हणतो —

''एखाद्या मस्तवाल कुत्र्याने

चघळावी हड्डी

तसा मृत्यू चघळतो कास्तकाराला

रोज नव्या चवीने''

(आयुष्य नांगरतांना...., पृ. १६)

कवी महेंद्र भवरे :

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि आर्थिक उदारीकरण यामुळे सर्वच सामाजिक अस्तित्व धोक्यात आले आहे. या विषयीचे चिंतन महेन्द्र भवरे यांनी आपल्या 'महासत्तेचे पीडादान' या कवितासंग्रहातून व्यक्त केले आहे. जागतिकीकरणात स्त्रीयांचे शोषण प्रचंड वाढले आहे. या संदर्भात कवी म्हणतात –

''चौकोनी डबक्यातील

निर्वस्त्र बायकांच्या थंड थ्रीडी आंघोळी

आपल्या डोळ्यातील शेवाळाच्या घासरगुंडीवर

वाहिन्यांचे वीणावादन''

(महासत्तेचे पीडादान, पृ.९)

''आजच्या घडीला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे वेगवेगळ्या दृष्टीने पाहिले जात आहे. काही लोक या प्रक्रियेला मानवी कल्याणाची संधी मानतात, तर काहींना ही प्रक्रिया मानवी कल्याणाच्या विरोधात आहे, असे वाटते. त्यामुळे स्वाभाविकच लोकसमूहात या प्रक्रियेसंबंधीचा आकलनाच्या पातळीवर एक गुंता निर्माण होतांना दिसतो आहे. हा गुंता सोडवून त्या प्रक्रियेसंबंधीचे एक स्पष्ट आकलन लोकमानसिकतेपुढे येणे गरजेचे आहे, ही जबाबदारी समाजातील विचारवंत पिढीची जशी आहे, तशीच ती कवी कलावंतांचीही आहे.''

**केतन पिंपळापूरे** :

जागतिकीकरणामुळे बदलत चाललेले वास्तव अधोरेखित करताना कवी केतन पिंपळापूरे म्हणतो,

''ग्लासनोस्त – प्रेरेस्त्रोईकाच्या नंतर

आपल्या प्रिय भूमिवर केले त्यांनी गॅटचे वृक्षारोपण

स्वदेशीच्या नावावर त्यांनी

एक्सपायर्ड विदेशी माल केला गोळा आणि

आपल्या डोक्यात घातला आहे आता

एलपीजीचा पालापाचोळा ! (माझ्या युच्या क्षितीजावरील अस्वस्थ)

अशाप्रकारे जागतिकीकरणाचे भयानक दुष्परिणाम आपआपल्या काव्यशैलीच्या माध्यमातून व्यक्त केले आहे.

**निष्कर्ष :**

१) जागतिकीकरण ही एक समिश्र संकल्पना आहे.

Research Hub International Journal

२) भांडवलशाही व्यवस्थेने तंत्रज्ञानाच्या क्रांतीने माणसाला दुय्यम केले आहे.

३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगाला व्यापले असून त्यापासून कोणतेही क्षेत्र सुटलेले नाही.

४) जागतिकीकरणाचे ताण—तणाव अनेक आंबेडकरवादी कवींनी आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे.

५) जागतिकीकरणातील अनेक प्रतिमा ही कविता वापरताना दिसते.

६) मोठ्या भांडवलवादी राष्ट्रांनी अविकसीत राष्ट्रांना ग्राहक बनवून आपली बाजारपेठ बनविली आहे.

७) आंबेडकरवादी कविता केवळ जागतिकीकरणाची भिषणता न दाखविता आपआपल्या कुवतीप्रमाणे उपाय सुचविताना दिसते.

८) मानवी भाव—भावनांचे बाजारीकरण सुद्धा ही कविता व्यक्त करतांना दिसते.

**संदर्भसूची :**


- जागतिकीकरण — मराठी भाषा व साहित्य : सद्य:स्थिती आणि भवितव्य, ले. डॉ. उत्तम कांबळे,
  आमची श्रीवाणी अंक दुसरा—२००८—०९,
  प्रकाशक — प्रगत अध्ययन संस्था, धुळे — पृ.८९.
- अध्यक्षीय भाषण — डॉ. अशोक पळवेकर, 'फुले—आंबेडकरी साहित्य संमेलन', वणी.
- अरूण काळे — 'नंतर आलेले लोक', लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००६.
- सुनील अभिमान अवचार — 'ग्लोबल वर्तमानाच्या कविता', आसावरी प्रकाशन, अमरावती.
- उत्तम कांबळे —'जागतिककरणात मराठी कविता (संपादित)', सुगावा प्रकाशन, पुणे—२००६,पृ. ९.
- हेमंतकुमार कांबळे — 'आयुष्य नांगरतांना', श्रावस्ती प्रकाशन, यवतमाळ.
- महेन्द्र भवरे — 'महासत्तेची पीडदान', मुंबई, २००५.
- केतन पिंपळापूरे — 'डेमोफून', समता संगर प्रकाशन, नागपूर.


Research Hub International Journal